# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ५८-२३ दिनांकः-१७/०२/२०२३

## जानेवारी महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत रुम नं. १५०६, १५ वा मजला, बिल्डींग नं ३० डी बी ओझोन, दहीसर पुर्व, मुंबई ४०० ०६८ या ठिकाणी काही इसम ICICI Lombard Insurance Policy व इतर नामांकीत कंपन्यांची विमा पॉलीसीचे नावाने संपर्क साधून भारतातील नागरीकांची आर्थिक फसवणुक करीत असल्याबाबत गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार वरिष्ठांचे मार्गदर्शन व आदेशानुसार सायबर गुन्हे कक्ष येथील अधिकारी व पोलीस पथकाने छापा कारवाई करुन सदरबाबत दिनांक ११/०१/२०२३ रोजी ०५.४० वाजता गुन्हा नोंद केला.

गुन्हयाचे तपासामध्ये आरोपीतांनी भारतातील बहुतेक राज्यातील नागरीकांची फसवणूक केले असल्याचे निष्पन्न झाल्याने नमूद गुन्हयात ४ आरोपीतांना अटक करुन त्यांचेकडून ०३ लॅपटॉप, ३२ मोबाईल, १० डेबिट कार्ड, ०३ आधारकार्ड, ०२ बँक पासबूक असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एन.सी.आर.पी पोर्टलवरुन २८ गुन्हे व १) माणिकपुर पोलीस ठाणे गु.रजि.नं. ०९/२०२३ भादंविसं ४२०,३४ प्रमाणे २) खेरवाडी पोलीस ठाणे गु.रजि.नं २१/२०२३ भादंविसं कलम ४१९,४२० सह आयटी ॲक्ट कलम ६६ (सी), ६६ (डी) ३) सायबर पोलीस ठाणे, रोहतक राज्य हरीयाना गु.रजि.नं. ४८/२०२२ भादंविसं ४२० प्रमाणे ४) मुलुगु पोलीस ठाणे, जि.सिध्दपेठ, राज्य तेलंगणा गु.रजि.नं.१४/२०२३ भादंविसं ४२० सह आयटी ॲक्ट कलम ६६ (सी), ६६ (डी)
येथील ४ असे एकुण ३२ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

सदरची कामगिरी करणारे सायबर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्निल वाव्हळ, पो.उप.नि. प्रसाद शेनोलकर, पो.अंम. गणेश इलग, प्रविण आव्हाड, मपोहवा. माधुरी धिंडे, मपोअं. पल्लवी निकम, आमिना पठाण, सुवर्णा माळी, मसुब प्रशांत शिरामे, आकाश बोरसे, राजेश भरकडे यांचा दिनांक १७/०२/२०२३ रोजी **मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये 'जानेवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल' क्रमांक-१ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.**




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर.**

२) दिनांक २७/०१/२०२३ रोजी १६.०० वा. चे पुर्वी वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत नायगांव पुर्व रिक्षा स्टँन्डचे ब्रिजखाली येथे अनोळखी मयत इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे याचे प्रेत नायगांव खाडीचे पाण्यातुन वाहत असल्याची माहीती प्राप्त झाल्यावरुन अं.मृ.रजी. नं. १५/२०२३ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता. मृत्युचे निश्चीत कारण समजण्यासाठी प्रेत जे.जे. हॉस्पीटल मुंबई येथे पाठविण्यात आले होते. डॉक्टरांकडून मयताचे गळयावर व डोक्यात कोणत्या तरी धारदार हत्याराने वार केल्याने त्याचा मृत्यु झाल्याबाबत शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यावरुन पो.उप.निरी.गजानन निवृत्तीराव जिकंलवाड, वय २९ वर्षे, नेम. वालीव पोलीस ठाणे यांच्या फिर्यादीवरुन गु.र.नं. १०५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१ प्रमाणे दिनांक २९/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गंभीर स्वरुपाचा खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्याकरीता मयताची ओळख पटविणे अत्यावश्यक असल्याने गुन्हे शाखा, कक्ष २ वसई युनिटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळी तपास पथके तयार करुन मिरा-भाईदंर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील, नजीकचे मुंबई, ठाणे व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील मनुष्य मिसिंग चेक केल्या. सदर मनुष्य मिसिंग चेक करताना मयताचे अंगावर असलेल्या कपडयांचे वर्णन, बांगुरनगर पोलीस ठाणे, मुंबई शहर येथील मनुष्य मिसींग रजी. नं. ५/२०२३ मधील मिसींग व्यक्तीचे कपडयाशी जुळल्याने मयताचे नाव कमरुददीन मोहम्मद उस्मान अन्सारी, वय ३५ वर्षे, रा. सुवीधा चाळ, भगतसिंग नगर, नंबर १, लिंकरोड, गोरेगांव, पश्चिम, मुंबई असल्याचे निष्पन्न करुन मयत ईसम रहात असलेल्या परीसरात जावून चौकशी केली असता त्याचे शेजारी राहणारे आरोपीत पती- पत्नी १) बिलाल उर्फ मुल्ला निजाम पठाण वय ४० वर्षे रा.सुरजा चाळ, भगतसिंग- १, गोरेगांव, (पुर्व) मुंबई, मुळ रा. १९९, बंगला एरीया,मेरठ

कॅन्ट, मेरठ, उत्तरप्रदेश पिन-२५०००१ २) सौफिया बिलाल पठाण वय २८ वर्षे रा.सदर हे घटना घडल्यापासुन परीसरातुन निघुन गेल्याची माहीती मिळाल्याने व त्यांचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना वापी (गुजरात) येथून ताब्यात घेवून नमूद गुन्हयात अटक करण्यात आली.

सदर गुन्हयाची उत्कृष्टरित्या उकल करणारे गुन्हे शाखा, कक्ष २, वसई युनिटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.निरी. सुहास भिमराव कांबळे, सहाफौज. रमेश भोसले, संजय नवले, पोहवा. चंदन मोरे, सचिन पाटील, जगदिश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, पोना. प्रशांत ठाकुर, पोअंम. अमोल कोरे सर्व नेम. गुन्हे कक्ष २ वसई , सहा.फौज. संतोष चव्हाण, वायरलेस यांचा दिनांक १७/०२/२०२३ रोजी **मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये 'जानेवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल' क्रमांक-२ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.**



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोलीस निरीक्षक श्री. शाहूराज रणवरे**

३) पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०९/१२/२०२२ रोजी २०.३० वा.चे सुमारास सिताराम हॉटेल जवळ, संतोषभुवन नाका, नालासोपारा (पु.) येथील आय.सी.आय.सी.आय. बँकचे ए.टी.एम. मध्ये फिर्यादी श्री. रितेश धर्मराज यादव, वय २२ वर्षे, रा. संतोषभुवन, नालासोपारा(पु.), ता.वसई हे त्यांचे काका श्री. हरीलाल यादव, वय ४५ वर्षे यांचे आय.डी.बी.आय. बँकेचे ए.टी.एम. कार्ड घेवुन पैसे काढत असतांना चार अनोळखी इसमांनी येवुन त्यांस किती वेळ लागणार तुला असे बोलून गोंधळ घालून, त्यांना बोलण्यात गुंतवुण त्यांचेकडील आय.डी.बी.आय. बँकेचे ए.टी.एम. कार्डचा पिन पाहुन ते हातचलाखीने बदलुन त्यांस दुसरे ए.टी.एम. कार्ड देवुन, फिर्यादी यांचे ए.टी.एम. कार्डचा वापर करुन त्यातुन ४०,०००/- रक्कम काढुन घेवुन त्यांची फसवणुक केले बाबत फिर्यादी यांनी

दिलेल्या तक्रारीवरुन चार अनोळखी आरोपीतांवर पेल्हार पोलीस ठाणेत गु.रजि.नं. I ९७२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४२०, ३४ प्रमाणे दिनांक १२/११/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचा तपास करीत असताना तांत्रिक माहितीवरुन नमूद गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन ते स्विफ्ट कारने मध्यप्रदेश मार्गे महाराष्ट्रात येत असल्याबाबत गोपनीय माहिती गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक सनिल पाटील यांना मिळाल्याने त्यांनी लागलीच सदरची माहिती शिरपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री. शिरसाठ यांना देवून त्यांच्या मदतीने आरोपीत नामे १) विकी पंडीत साळवे, वय ३२ वर्षे, २) विकी राजु वानखेडे, वय २२ वर्षे, ३) अनिल कडोबा वेलदोडे, वय २९ वर्षे, ४) वैभव आत्माराम महाडीक, वय ३४ वर्षे, सर्व रा. भैय्यासाहेब आंबेडकर नगर, खेमानी २, उल्हासनगर २, जि. ठाणे यांना जि.धुळे येथे जावुन ताब्यात घेतले. त्यांच्या अंगझडती दरम्यान त्यांच्याकडे वेगवेगळया बँकाचे एकुण ९४ ए.टी.एम.कार्ड, गुन्हयात मिळून आलेल्या रक्कमेतून खरेदी केलेली १ स्विफ्ट कार, रोख रक्कम रु. ८९,०००/- व वेगवेगळया कंपनीचे ३९,०००/ रुपये किंमतीचे मोबाईल फोन असा एकुण ५,२८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आल्याने तो हस्तगत करण्यात आला आहे. नमूद आरोपीताकडून एकूण १६ फसवणुकीचे गुन्हे उघड करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी करणारे पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसंत लब्दे, पोलीस निरीक्षक महेंद्र शेलार, पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार कार्यालयातील पोहवा. तारडे, नामदेव ढोणे यांचा दिनांक १७/०२/२०२३ रोजी **मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये 'जानेवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल' क्रमांक-३ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.**



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे**

दिनांक ३०/१/२०२३ रोजी १८.३० वाजण्याचे सुमारास सिध्दीविनायक गॅरेज समोर, जांगीड सर्कल जवळ, एम.टी.एन.एल.रोड, मिरारोड पूर्व येथे तीन ते चार अज्ञात इसमांनी अंकुश राजेशकुमार राज, वय २० वर्षे, रा. १०३, सी विंग, क्विन्सपार्क, शक्ती टॉवर मिरारोड पूर्व याचे छातीवर कोणत्यातरी हत्याराने गंभीर दुखापती करुन जीवे ठार मारलेबाबत त्याची आई फिर्यादी श्रीमती रुपादेवी राजेशकुमार राज यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नंबर ३७/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आला होता.

गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा युनिट यांनी सुरु करुन गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या अनुषंगाने आरोपीत नामे १) आयुष भानुप्रसाद सिंग, वय १९ वर्षे, २) आकीब खालीद अन्सारी, वय २० वर्षे, ३) शेख फरहान नजरे आलम, वय १८ वर्षे, ४) अरमान हबीब लदाफ, वय १८ वर्षे, ५) हैदर पैंगबर पठाण, वय १८ वर्षे, ६) अशपाक अख्तर मंसुर, वय २५ वर्षे, ७) मेहताब रहीमुद्दीन खान, वय २२ वर्षे, ८) अमित सौरव सिंग, वय २२ वर्षे, ९) सरवर हुसैन शफीकउल्ला खान यांस ताब्यात घेऊन विचारणा केली असता मयत याचा मामा हर्ष राज व आरोपी आयुष भानुप्रताप सिंग याचेमध्ये वाद झाले होते त्यावेळी मृतक अंकुश राजेशकुमार राज याने त्यांची भांडणे सोडवल्याचा राग मनात धरुन अटक आरोपीत यांनी आपापसात संगनमत करुन सदर गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्हयात अटक केली आहे.

सदरची कामगिरी करणारे मिरारोड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह बागल, गुन्हे शाखा, कक्ष १, काशिमिरा युनिटचे पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. टोकले, सुर्वे, बोडके पोउनि. वंजारे, सफौ. तांबे, वाडीले, पाटील पोहवा. शिंदे, गर्जे, राऊत (नेम. सपोआ, गुन्हे कार्यालय), पो.हवा. सावंत, गायकवाड, भिमथापा, लांडगे, यादव पाटील, राजपुत, पो.शि. विसपुते, सुर्यवंशी, पवार, पो.हवा. गाडेकर, चकोर, सुरोशी, गोसावी, पोअं. शेळके, गुजर यांचा दिनांक १७/०२/२०२३ रोजी **मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये 'जानेवारी महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणून स्पेशल रिवॉर्ड १'** देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि. श्री. विजयसिंह बागल व पो.नि.अविराज कुराडे**

दिनांक २१/०१/२०२३ रोजी सकाळी ०६.४५ वा. ते सायंकाळी १८.०० वा.चे मुदतीत रुम नं. ४०३, श्री. साई गणेश अर्पाटमेंट २, विकास नगरी, फुलपाडा, विरार पुर्व येथे अनोळखी चोरटयाने फिर्यादी नामे श्रीमती. रुक्मिणी कृष्णा गोवेकर व त्यांचे बिल्डींग मध्ये राहणारे साक्षीदार प्रविण पांगम यांचे राहते घराचे मुख्य दरवाचे कडी कोयंडा तोडुन दरवाज्याने आत प्रवेश करुन २८,५००/- रु. किमंतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी करुन नेले म्हणुन दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि नंबर ७५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, कक्ष ३, विरार युनिट समांतर तपास करीत असताना तांत्रिक विश्लेषण व मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे आरोपी अक्रम फारुक अन्सारी, वय २४ वर्षे, सध्या राहणार रुम नं. ६, दिवा नगर चाळा, वाघोबा मंदीराचे समोर, रायपाडा, विरार पुर्व यास दिनांक २३/०१/२०२३ रोजी अटक करण्यात आली. त्याच्याकडून गुन्हयात वापरण्यात आलेले वाहन, सोन्या चांदीचे दागीने, मोबाईल फोन असा एकूण ४,२४,०५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन एकूण १४ घरफोडीचे गुन्हे उघड करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा, कक्ष ३, विरार युनिटवे पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पो.उप.निरी. उमेश अनंत भागवत, पो.हवा. शिंदे, पाटील, घेरे, बारावकर, सकपाळ, पाटील, जाधव, मसुब. वानखेडे, सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ३ **यांचा श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी दिनांक १७/२/२०२३ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये 'जानेवारी महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणून स्पेशल रिवॉर्ड २' देवून सत्कार केला आहे.**




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद बडाख**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २८/१२/२०२२ रोजी सायंकाळी ७.०० वा. ते दिनांक २९/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा चे दरम्यान तुंगारेश्वर इंडस्ट्रीयल या कपंनीचे परीसरात प्रवेश करुन कंपनीचे समोरील गटारावरील ७ लोखंडी झाकण एकुण ७०,०००/- रुपये किंमतीचे असा माल चोरी झालेबाबत अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा नोंद क्र. I २९/२०२३ भा.दं.वि.सं.१८६० चा अधिनियम कलम ३७९ प्रमाणे दाखल होता. सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने गुन्हयाचे घटनास्थळावरील सिसिटीव्ही फुटेज तसेच गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन रेक्रॉर्डवरील तसेच इतर आरोपीत नामे १) विकी नरेंद्र सिंग, वय २१ वर्ष, वालीव वसई पुर्व, २) हेंमत रमेश मोकाशी, वय २५ वर्ष, रा. भोयदापाडा नाका, वसई पुर्व, ३) अजित शिबु ठाकुर, वय ३० वर्ष, वालीव, वसई पुर्व, ४) विघ्नेश केशव पारधी, वय २२ वर्ष, वालीव, वसई पुर्व, ५) मोतीम अब्दुल सज्जाक खान, वय २१ वर्ष, रा. सोपारा फाटा, नालासोपारा पुर्व यांना अटक करुन गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत यांच्याकडे कौशल्याने तपास केला असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील खालील गुन्हे तसेच वनराई, मालाड मुंबई या पोलीस ठाण्याचे हददीत गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याकडून गुन्हयातील चोरीस गेलेली ॲटो रिक्षा, मोटारसायकल, गटारावरील लोखंडी झाकण, सिलेंडर बाटले, रोख रक्कम, ॲटो रिक्षाचे टायर, बॅनरच्या फ्रेम असा एकुण २,६०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन एकूण ८ चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात आले.

सदरची कामगिरी करणारे वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे, पो.नि.मिलींद साबळे, स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, पोना. बाळु कुटे, पो.अंम. गजानन गरीबे, सचिन मोहीते, सचीन खताळ, जयवंत खंडवी यांचा **श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी दिनांक १७/२/२०२३ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये ‘जानेवारी महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणून स्पेशल रिवॉर्ड ३’ देवून सत्कार केला आहे.**



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे**